सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२६/288
दिनांक :- 29 JAN 2026

**प्रति,**

**प्राचार्य,**
शासकीय / अनुदानित/विनाअनुदानित,
पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व मान्यतेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/१७६० दिनांक २४/१२/२०२५.
२.मा.उपसचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/१७२७दि. १९/१२/२५.
३. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/गुणवत्ता यादी मान्यता/२०२५/११२१ दि.२९/१२/२०२५.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदीनुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक समान असावी तसेच, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमानुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, दोन भागात प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ६ नुसार निश्चित करण्यात आले आहे. प्राधिकरणाने निश्चित केलेले वेळापत्रक आपल्या संस्थेला अवगत करण्यात आले आहेत.

आता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रामध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकातील भाग १ (Group I) मध्ये, तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पुर्ण करुन प्रस्ताव प्रमाणित करणे, महाविद्यालयांनी तपासणी अहवालासह प्रवेश मान्यता प्रस्ताव, प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्याचे वेळापत्रक नमूद केलेले आहे. (सोबत दोन्ही पत्राच्या प्रती जोडण्यात येत आहेत) प्रवेश नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या पध्दतीने आवश्यक ती कार्यवाही काटेकोरपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत कोणतेही प्रकरण उद्भवल्या अंतिम जबाबदारी आपली राहिल याची नोंद घ्यावी, तसेच आपल्या संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी बाबतची कार्यवाही विहीत कालमर्यादेत पुर्ण करण्यात यावी, याची नोंद घ्यावी.

सहपत्र :- वरिलप्रमाणे

(डॉ. व्हि. आर. मानकर)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :-** १. प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597475, 465, 492, 442, 443, 447
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/गुणवत्ता यादी मान्यता/२०२५/ ११२१ दिनांक : 29 DEC 2025

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व मान्यते बाबत

संदर्भ : १)मा.सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/१७६०, दि.२४.१२.२५
२)उपसचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/१७२७, दि.१९.१२.२५
२)संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/गुणवत्ता यादी मान्यता/२०२५/१०६२, दि.२.१२.२०२५

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (१) मधील तरतुदींनुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक-समान आहेत. तसेच, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांनुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, दोन भागात प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.६ नुसार निश्चित करण्यात आले आहे. प्राधिकरणाने निश्चित केलेले वेळापत्रक आपल्या विभागातील संबंधित संस्थांना अवगत करण्याकरीता संचालनालयाने वेळोवेळी कळविलेले आहे.

संचालनालयाचे पत्र क्रमांक २/एनजीसी/गुणववत्ता यादी पडताळणी/२०२५/DTEM-D२/१७१/२०२५-DESK २ दि.०४.११.२०२५ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता आपल्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करण्याकरिता संचालनालयाच्या वतीने आपणास प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

आता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संदर्भ क्र.१ च्या पत्रामध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकातील भाग १ (Group I) मध्ये, तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश पडताळणी/छाननी प्रक्रिया पुर्ण करून प्रस्ताव प्रमाणित करणे, महाविद्यालयांनी तपासणी अहवालासह प्रवेश मान्यता प्रस्ताव, प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्याचे वेळापत्रक नमूद केलेले आहे. तसेच प्राधिकरणाकडील संगणक प्रणालीच्या माध्यमातून करावयाच्या प्रक्रियेबद्दल संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये अवगत केलेले आहे. (सोबत दोन्ही पत्राच्या प्रती जोडण्यात येत आहेत.) प्रवेश नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या पध्दतीने आवश्यक ती कार्यवाही काटेकोरपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत कोणतेही प्रकरण उद्भवल्यास अंतिम जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी, तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांनाही प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी बाबतची कार्यवाही विहीत कालमर्यादेत पुर्ण करणेबाबत कळविण्यात यावे.

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. ४७ दिनांक 05.01.26

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-०१ यांना माहीतीकरीता.

D:\DTENS_Sanjawani\२०२५\Merit List-२०२५\Letter to RO_Merit List approval shedule-२३.१२.२०२५.docx

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महत्वाचे/कालमर्यादा/ईमेलद्वारे

क्रमांक: संकिर्ण २०२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/ १५६० दिनांक: 24 DEC 2025

प्रति,

१. महासंचालक, कृषी शिक्षण संचालनालय, मुंबई
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
३. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व मान्यतेबाबत...**

संदर्भ: १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदी.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक ०३/०७/२०२५, १५/१०/२०२५, ३०/१०/२०२५, २१/११/२०२५ व १९/१२/२०२५ रोजींची पत्रे.
३. Maharashtra Admissions Regulating Authority (Redressal of Grievances of students and stake holders, Approval of Admission Proposals and Review) Regulations, 2025.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रवेश प्रक्रिया संपत आलेली आहे. प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत करण्यात आलेल्या प्रवेशांना अधिनियम २०१५ मधील तरतुदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपद्धती खालीलप्रमाणे विहीत करण्यात आलेली आहे.

(एक) प्रत्येक विनाअनुदानित संस्था प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, संबंधीत संचालनालयाला "प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव सादर करील,

(दोन) प्रत्येक संस्था संबंधीत संचालनालयाने प्रमाणित केलेले असे प्रस्ताव, अशा प्रमाणनाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालमर्यादेच्या आत प्रवेश नियामक प्राधिकरणाला सादर करील,

(तीन) प्रवेश नियामक प्राधिकरण, संस्थांकडून मिळालेल्या अशा प्रस्तावांची प्रत्येक वर्षाच्या ३० जानेवारी पूर्वी छाननी करील आणि त्यांना मान्यता देईल.

२. अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. तथापि, मागील वर्षाप्रमाणेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सर्व संचालनालयांनी संगणक प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन पद्धतीने प्रवेश पडताळणी पुर्ण करावयाची आहे. त्याअनुषंगाने, प्राधिकरणाकडील संगणक प्रणालीच्या माध्यमातुन ऑनलाईन प्रवेश पडताळणी प्रक्रिया, सर्व संचालनालयांना अवगत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

महत्वाचे/ईमेलद्वारे-

क्रमांक: संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/ ७५ २८ दिनांक: 19 DEC 2025

प्रति,
१. महासंचालक, कृषी शिक्षण संचालनालय, मुंबई
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
३. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई

विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश तपासणी / पडताळणी वेळापत्रक...

संदर्भ: १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदी.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्र. ६ मधील निर्णय.
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक ३/०७/२०२५ रोजीचे पत्र.
४. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २१/११/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश.
५. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक २१/११/२०२५ रोजीचे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. तथापि, मागील वर्षाप्रमाणेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सर्व संचालनालयांनी संगणक प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन पद्धतीने प्रवेश पडताळणी पुर्ण करावयाची आहे. त्याअनुषंगाने, प्राधिकरणाकडील संगणक प्रणालीच्या माध्यमातुन ऑनलाईन प्रवेश पडताळणी प्रक्रिया, संचालनालयास संदर्भ क्र. ३ व ५ वरील पत्रान्वये अवगत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदींनुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक-समान असावी. तसेच, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांनुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत विषय क्र.६ नुसार दोन भागात निश्चित करण्यात आले आहे. तसेच, प्राधिकरणाच्या दिनांक २१/११/२०२५ रोजीच्या बैठकितील निर्णयानुसार भाग १ (Group I) मधील तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधीत संचालकांकडे सादर करण्याचे खालीलप्रमाणे सुधारित वेळापत्रक संबंधीतांना कळविण्यात आले आहे.

भाग - १ (Group - I)

| अ.क्र. | तपशील | सुधारित दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात आलेली प्रवेश बंद तारीख | ३१/१०/२०२५ |
| २. | व्यावसायिक तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांकडे सादर करण्याची अंतिम तारीख | ३०/११/२०२५ |
| | तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, फार्म डी., बी. प्रॅक्टीस, पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी. (पी.बी.) या अभ्यासक्रमांकरिता प्रवेश मान्यता प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालकांकडे सादर करण्याची अंतिम तारीख | ०२/१२/२०२५ |
| ३. | संबंधित संचालकांनी प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करुन प्रस्ताव प्रमाणित करण्याची अंतिम तारीख | ३१/१२/२०२५ |
| ४. | संचालकांनी छाननी / पडताळणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव महाविद्यालयामार्फत प्राधिकरणास सादर करण्याची अंतिम तारीख | २८/०२/२०२६ |

सद्यस्थितीमध्ये संचालनालय स्तरावर तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव छाननी / पडताळणी प्रक्रिया सुरु आहे. परंतू, सदर वेळापत्रकातील भाग १ (Group I) मधील अ.क्र. ३ नुसार तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांनी (ऑनलाईन) प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करुन प्रस्ताव प्रमाणित करण्याची अंतिम तारीख ३१/१२/२०२५ अशी आहे. याबाबत संबंधित महाविद्यालयांकडून प्रवेश पडताळणीची प्रक्रिया वेळेत पूर्ण करुन घेण्याबाबत व वरील वेळापत्रकातील अनुक्रमांक ४ नुसार आपल्या संचालनालयाच्या तपासणी अहवालासह प्रवेश मान्यता प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणास दिनांक २८/०२/२०२६ रोजीपर्यंत सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन कृपया कळविण्यात यावे.

सोबत - वरीलप्रमाणे

आपला विश्वासू

(निलेश फोलके)
**उपसचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई**

प्रत माहितीकरीता अग्रेषित,

१. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित, -
१. सर्व संबंधीत प्राचार्य, तंत्रशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
२. सर्व संबंधीत प्राचार्य, कला शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
३. सर्व संबंधीत प्राचार्य, कृषी शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये

प्रत, -
१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक
३. सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना उचित कार्यवाहीसाठी
४. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597475, 465, 492, 442, 443, 447
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/गुणवत्ता यादी मान्यता/२०२५/ १०६२        दिनांक : - 2 DEC 2025

प्रति,
मा.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी वेळापत्रकाबाबत...

संदर्भ : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/१५४०, दि.२१.११.२०२५

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) मधील तरतुदींनुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक-समान असावी. तसेच, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांनुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, दोन भागात प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.६ नुसार निश्चित करण्यात आले आहे. तसेच, सदर वेळापत्रक दिनांक ३/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व यापुर्वी कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त भाग १ (Group १) मधील तंत्र शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तंत्रशिक्षण अंतर्गत प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, फार्म डी., बी. प्रॅक्टीस, पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी. (पी.बी.) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दिनांक १७/११/२०२५ रोजी संपलेली आहे. तसेच, उपरोक्त तीन विभागांतील महाविद्यालयांनी तांत्रिक अडचणींमुळे विहीत कालावधीत प्रस्ताव सादर करता न आल्याने मुदतवाढ देण्याची विनंती केली होती.

त्याअनुषंगाने, प्राधिकरणाच्या दिनांक २१/११/२०२५ रोजीच्या बैठकितील उपरोक्त दिनांक ३/०७/२०२५ रोजीच्या पत्रातील भाग १ (Group १) मधील तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधीत संचालकांकडे सादर करण्यास मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार, ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव अद्याप संचालकांकडे ऑनलाईन सादर केलेले नाहीत, त्यांनी सुधारीत वेळापत्रकानुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव दि.२.१२.२०२५ रोजी पर्यंत सादर करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी संचालनालयास कळविले आहे. तसेच अधिनियम २०१५ मधील तरतुदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वेळापत्रकानुसार कार्यवाही न झाल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही अथवा / आणि संबंधितांवर अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेण्याबाबत कळविले आहे.

त्यानुसार आपल्या विभागातील सर्व संबंधित संस्थांना प्रवेश मान्यता प्रस्ताव दि.२.१२.२०२५ रोजी पर्यंत सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे व याची गांभीर्याने नोंद घेण्यास सुचित करण्यात यावे.

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
क्र 5556 दिनांक 11.12.25

(डॉ.सुनिल भामरे)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

ऑनलाईन सादर केलेले नाहीत त्यांनी खालील सुधारित वेळापत्रकानुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करावेत.

भाग - १ (Group - I)

| अ.क्र. | तपशील | सुधारित दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात आलेली प्रवेश बंद तारीख | ३१/१०/२०२५ |
| २. | व्यावसायिक तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांकडे सादर करण्याची अंतिम तारीख | ३०/११/२०२५ |
| | तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, फार्म डी., बी. प्रॅक्टीस, पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी. (पी.बी.) या अभ्यासक्रमांकरिता प्रवेश मान्यता प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालकांकडे सादर करण्याची अंतिम तारीख | ०२/१२/२०२५ |
| ३. | संबंधित संचालकांनी प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करुन प्रस्ताव प्रमाणित करण्याची अंतिम तारीख | ३१/१२/२०२५ |
| ४. | संचालकांनी छाननी / पडताळणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास सादर करण्याची अंतिम तारीख | २८/०२/२०२६ |

अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या उपरोक्त वेळापत्रकानुसार कार्यवाही न झाल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही अथवा / आणि संबंधितांवर अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

सोबत - वरीलप्रमाणे

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
**सदस्य सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई**

प्रत माहितीकरीता अग्रेषित,

१. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित, -

१. सर्व संबंधीत प्राचार्य, तंत्रशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
२. सर्व संबंधीत प्राचार्य, कला शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
३. सर्व संबंधीत प्राचार्य, कृषी शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये

प्रत, -

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक
३. सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना उचित कार्यवाहीसाठी
४. लेखाविभाग यांनी उपरोक्त वेळापत्रकाच्या अनुषंगाने, प्रक्रिया शुल्काची परिगणना करुन संबंधीतांना प्राधिकरणाच्या संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करुन द्यावी.
५. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

(६२१)

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

**महत्त्वाचे/ईमेलद्वारे-**
क्रमांक: संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/ १५४० दिनांक: 21 NOV 2025

प्रति,
१. महासंचालक, कृषी शिक्षण संचालनालय, मुंबई
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
३. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी वेळापत्रक...**

संदर्भ: १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदी.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्र. ६ मधील निर्णय.
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक ३/०७/२०२५ रोजीचे पत्र.
४. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २१/११/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदींनुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक-समान असावी. तसेच, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांनुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, दोन भागात प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.६ नुसार निश्चित करण्यात आले आहे. तसेच, सदर वेळापत्रक दिनांक ३/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधीतांना यापुर्वी कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त भाग १ (Group I) मधील तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तंत्रशिक्षण अंतर्गत प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, फार्म डी., बी. प्रॅक्टीस, पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी. (पी.बी.) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दिनांक १७/११/२०२५ रोजी संपलेली आहे. तसेच, उपरोक्त तीन विभागातील महाविद्यालयांनी तांत्रिक अडचणींमुळे विहीत कालावधीत प्रस्ताव सादर करता न आल्याने मुदतवाढ देण्याची विनंती केली होती.

त्याअनुषंगाने, प्राधिकरणाच्या दिनांक २१/११/२०२५ रोजीच्या बैठकितील उपरोक्त दिनांक ३/०७/२०२५ रोजीच्या पत्रातील भाग १ (Group I) मधील तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधीत संचालकांकडे सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार, ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव अद्याप संचालकांकडे

D:\मुक्ता\शैक्षणिक वर्ष २०२५-२६\प्रवेश मान्यता प्रक्रिया.docx